




दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : १८२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.१३ फेब्रुवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# बारावीच्या पहिल्याच पेपरला सामूहिक कॉपी; १९ जणांवर कारवाई

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, छ.संभाजीनगर :** बारावी परीक्षेत विद्यार्थी चक्क एकमेकांच्या उत्तरपत्रिका पाहून लिहित होते आणि हे सर्व केंद्रांवरील शिक्षकांच्या सहकार्याने सुरू होते. सामूहिक कॉपीचा हा धक्कादायक प्रकार पहिल्याच दिवशी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील जैतापूर येथील राष्ट्रीय उच्च माध्यमिक विद्यालय केंद्रावर समोर आला.



सामूहिक कॉपीचा सर्व प्रकार 'सीसीटीव्ही'मध्ये कैद झाला. आता शिक्षण विभागाकडून केंद्रसंचालकासह १९ जणांवर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती. यासह जालन्यातही कॉपी प्रकरणी एकाच पथकाकडून सहा विद्यार्थ्यांवर कारवाई करण्यात आली.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने बारावीची लेखी परीक्षा मंगळवारपासून सुरुवात झाली. छत्रपती संभाजीनगर विभागातील पाच जिल्ह्यांतून ४५४ परीक्षा केंद्रावरुन एक लाख ९० हजार ५९२ तर लातूर विभागातील तीन जिल्ह्यातील २५३ परीक्षा केंद्रावरुन ९६ हजार ४९६ विद्यार्थी परीक्षा देत आहेत.

माध्यमिक शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर, विस्तार अधिकारी सिताराम पवार यांच्या भरारी पथकाने राष्ट्रीय उच्च माध्यमिक विद्यालय केंद्राला भेट दिली. परीक्षेदरम्यान काही विद्यार्थ्यांकडून नक्कल होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर, परीक्षा केंद्रावर उपलब्ध 'सीसीटीव्ही'च्या माध्यमातून संपूर्ण प्रकरणाची सखोल तपासणी करण्यात आली. तपासणीत अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या. विद्यार्थ्यांनी एकमेकांच्या उत्तरपत्रिकांकडे पाहून गैरप्रकार केल्याचे स्पष्ट झाले. त्यासह एका बाकावर दोन विद्यार्थी तर काही विद्यार्थी उभे राहूनही उत्तरे लिहत होती. हे सर्वकाही शिक्षकांच्या सहकार्याने सुरू असल्याचे आढळले. शिक्षकच सामूहिक कॉपी प्रकरणात सहभागी लक्षात येताच 'सीसीटीव्ही' फुटेज शिक्षण विभागाने ताब्यात घेतले. आणि कारवाईची प्रक्रिया सुरू केली. केंद्र संचालकांसह तब्बल १९ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू होती. सर्वांत मोठी कारवाई

जिल्ह्यातील राष्ट्रीय उच्च माध्यमिक विद्यालय केंद्रांवर इयत्ता १२ वीच्या इंग्रजी पेपर परीक्षेदरम्यान आढळून आलेल्या गैरप्रकाराच्या प्रकरणात दक्षता समितीच्या आदेशानुसार कठोर कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. ही कारवाई जिल्ह्यातील आजपर्यंतच्या सर्वात मोठ्या परीक्षा–संबंधित कारवायांपैकी एक मानली जात आहे.

**बैठे पथकावरही कारवाई..!**

या प्रकरणात परीक्षा केंद्र संचालकासह एकूण १९ जणांविरुद्ध कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. यामध्ये जिल्हा परिषद कर्मचारी असलेल्या पर्यवेक्षक शिक्षक व बैठे पथकातील अधिकाऱ्यांविरुद्ध निलंबनाचे प्रस्ताव दाखल करण्यात आला. तसेच, इतर संस्थांशी संबंधित कर्मचाऱ्यांविरोधात त्यांच्या संस्थेमार्फत संस्थांतर्गत शिस्तभंगात्मक कार्यवाही करून आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे, असे अधिकारीसूत्रांनी सांगितले.

**तात्काळ अदलाबदल**

परीक्षा केंद्रावरील प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता, शिक्षण विभागाने तात्काळ निर्णय घेत या परीक्षा केंद्रावरील संपूर्ण स्टाफ बदलला. केंद्र प्रमुखांसह १४ व दोन सहाय्यक असे १७ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. पुढील सर्व पेपर शिस्तीत व नियमानुसार पार पडाव्यात यासाठी नव्याने नियुक्त कर्मचाऱ्यांना करण्यात आल्याचे आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

**३३४ विद्यार्थी**

संबंधित परीक्षा केंद्रावर १४ परीक्षा दालन आहेत. परीक्षा केंद्रांवर ३३४ परीक्षार्थी परीक्षा देत आहेत. त्यात इंग्रजीच्या विषयाच्या पेपरला ३२७ विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. तर सात विद्यार्थी गैरहजर होते, असे अधिकारीसूत्रांनी सांगितले.

> "परीक्षा केंद्रांवर भेट दिल्यानंतर कॉपीचा प्रकार लक्षात आला. 'सीसीटीव्ही' फुटेजची सखोल सखोल तपासणी केल्यानंतर सर्व प्रकार लक्षात आला. यानंतर तात्काळ कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.
>
> **– अश्विनी लाठकर,**
> **माध्यमिक शिक्षणाधिकारी,**
> **छत्रपती संभाजीनगर**

# यापुढे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मायभूमीत किंगमेकर?

## जावली–महाबळेश्वरमध्ये चर्चेला उधाण...

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.११, सातारा :** सातारा –जावली, महाबळेश्वर नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या निकालानंतर जावली–महाबळेश्वर तालुक्यात राजकीय चर्चांना वेग आला आहे. जिल्हा परिषद कुसुंबी गटातून शिवसेनेच्या कविता ओंबळे यांनी विजय संपादन केला असून पंचायत समिती आंबेघर तर्फ मेढा गणातून अतिष कदम व कुसुंबी गणात सुनिता दुंदळे यांचाही विजय झाला आहे. जिल्हा परिषद तळदेव गटातून शिवसेनेचे अजित संकपाळ तर गणातून संजय शेलार,कुंभरोशी गणात संजय मोरे यांनी बाजी मारली.या निकालामुळे स्थानिक राजकारणात शिवसेनेची ताकद वाढल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.



विशेष म्हणजे या भागाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मायभूमी मानले जाते. त्यामुळे या निकालाकडे केवळ स्थानिक यश म्हणून नव्हे तर शिंदे यांच्या प्रभावाची चुणूक म्हणूनही पाहिले जात आहे. कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून आगामी काळात जावली महाबळेश्वर तालुक्यांच्या किंबहुना सातारा जिल्ह्याच्या राजकारणात एकनाथ शिंदे किंगमेकर ठरणार का? अशी चर्चा सर्वत्र रंगताना दिसते.

या निवडणुकीची आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे शिवसेना आणि भाजप यांची राज्यात सत्ता असताना या ठिकाणी मात्र भाजप आणि शिवसेना थेट एकमेकांच्या विरोधात लढले. विशेष म्हणजे या लढतीत शिवसेनेला राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) पक्ष प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांची साथ मिळाल्याने त्याचा फायदा शिवसेनेला झाल्याचे निरीक्षण व्यक्त केले जात आहे. याशिवाय माजी आमदार दगडूदादा सपकाळ,एकनाथ ओंबळे आणि अंकुश बाबा कदम यांनीही आपल्या प्रभावातून स्थानिक पातळीवर महत्त्वाची भूमिका बजावल्याची चर्चा आहे.


स्थानिक राजकीय जाणकारांच्या मते, या विजयामुळे संघटनात्मक बळ वाढण्याबरोबरच पुढील निवडणुकांसाठी शिवसेनेला मजबूत पाया मिळाला आहे. मतदारांनी विकासाच्या मुद्द्यांवर मतदान केल्याचे विजयी उमेदवारांनी सांगितले असून तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, विरोधी पक्षांनी मात्र हा निकाल स्थानिक समीकरणांचा परिणाम असल्याचे सांगत आगामी निवडणुकांमध्ये परिस्थिती बदलण्याचा दावा केला आहे. तरीही सध्याच्या निकालाने जावली–महाबळेश्वरच्या राजकारणात नवे समीकरण तयार होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

# ठाकरे सेनेच्या उपतालुका प्रमुखाच्या शेतात ४८५ किलो अफू

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, धाराशिव :** उबाठा सेनेचा उपतालुकाप्रमुख असलेल्या समाधान उघडे याच्या शेतात कांद्याच्या पिकात लपवून सुरू असलेला अफूचा काळा धंदा उघडकीस आला आहे.



पोलिसांनी हा सगळा प्रकार चव्हाट्यावर आणला असून वाशी तालुक्यातील दशमेगाव शिवारातून तब्बल ७२ लाख ८४ हजार रुपयांची अफूची रोपे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जप्त केली आहेत. खासदाराचा जवळचा कार्यकर्ता असलेल्या अन् लपवून कोट्यावधींची अफू शेती करणाऱ्या शिवसेना उपतालुका प्रमुखावर वाशी पोलिसात अमली पदार्थांची लागवड केल्याप्रकाणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खासदाराच्या कार्यकर्त्याचे काळे धंदे उघडकीस. अफूच्या शेतीला खासदाराचे पाठबळ. वाशीत कोटीभर रुपयांच्या अफू शेतीवर एलसीबीची कारवाई. उबाठा सेनेच्या शेतात कांदाच्या पिकात अफूची शेती. खासदाराच्या जवळचा कार्यकर्ता असलेल्या उबाठाच्या समाधान उघडे नावाच्या वाशी तालुका प्रमुखावर अवैध अमली पदार्थ उत्पादन घेतल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेबाबत अधिक तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

# शाळेची जमीन खाजगी नावावर; संतप्त ग्रामस्थ रस्त्यावर





**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१२, विंचूर (नाशिक) :** शिक्षण मंदिराच्या जमिनीवर डल्ला मारण्याच्या कथित प्रयत्नांविरोधात आज विंचूर येथील ग्रामस्थांचा संताप अनावर झाला. नाशिक–छत्रपती संभाजीनगर महामार्गावर संतप्त ग्रामस्थांनी 'रास्ता रोको' आंदोलन केल्यामुळे तब्बल एक तास वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती.

**नेमके प्रकरण काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, विंचूर येथील जिल्हा परिषद शाळेच्या गट नं. ६२७ मधील जमिनीचा व्यवहार निमगाव येथील मधुकर रामचंद्र गायकर यांनी कथितरित्या केल्याचे समोर आले आहे. ही खरेदी पूर्णपणे बेकायदेशीर असल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. गावाच्या मुलांच्या भविष्याशी संबंधित असलेल्या शाळेची जागा एका खासगी व्यक्तीच्या नावे कशी झाली, यावरून ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

**आंदोलनाचा थरार आणि मागण्या**

सकाळी अचानक शेकडो ग्रामस्थ रस्त्यावर उतरल्याने महामार्गाच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. आंदोलकांनी प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

**त्यांच्या मुख्य मागण्या खालीलप्रमाणे आहेत...**

- जिल्हा परिषद शाळेची बेकायदेशीर खरेदी तात्काळ रद्द करण्यात यावी.
- संबंधित खरेदीदार मधुकर गायकर यांच्यावर गुन्हा दाखल व्हावा.
- या व्यवहाराला मूकसंमती देणाऱ्या जबाबदार शासकीय अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी.

**प्रशासनाकडून चौकशीचे आश्वासन...**

आंदोलनाची तीव्रता पाहता पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. शाळेची जमीन ही आमची संस्कृती आणि मुलांचे भविष्य आहे. ती विकण्याचा अधिकार कोणालाही नाही, असा पवित्रा ग्रामस्थांनी घेतला. पोलिसांनी मध्यस्थी करत वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांमार्फत या प्रकरणाची चौकशी करण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. मात्र, आठवडाभरात कारवाई न झाल्यास अधिक तीव्र करत याच्या चारपट आंदोलन छेडण्याचा इशारा विंचूरकरांनी दिला आहे. यावेळी लासलगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांनी चोक बंदोबस्त ठेवला होता.

# शॉर्टसर्किटने डोंगरगावातील पोल्ट्री फार्म जळून खाक

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१२, मुदखेड (नांदेड) :** तालुक्यातील डोंगरगाव येथील गावालगत असलेला कोंबड्यांचा पोल्ट्री फार्म शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या भीषण आगीत जळून खाक झाल्याची घटना घडली असुन आगीत सुमारे पाच लाख रुपयांचे नुकसान झाले असून अल्पभूधारक शेतकरी देविदास मोहन केदारे हे मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले आहेत. डोंगरगाव येथील देविदास केदारे यांच्याकडे अवघी सोळा गुंठे शेती असून शेतीला जोडधंदा म्हणून त्यांनी गावालगतच्या प्लॉटमध्ये पोल्ट्री व्यवसाय सुरू केला होता. त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह शेती आणि पोल्ट्रीच्या उत्पन्नावर अवलंबून होता. मात्र अचानक झालेल्या शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीने त्यांचा हा व्यवसाय पूर्णतः उध्वस्त झाला. पोल्ट्री फार्मच्या वरून महावितरणची मोठी वीजवाहिनी जात असल्याने तांत्रिक बिघाड व कुजलेल्या तारांमुळे शॉर्टसर्किट झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच महावितरणचे ग्रामीण कनिष्ठ अभियंता एस. पी. सोनकांबळे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.



या आगीत व्यवसायासाठी आणलेली सुमारे एक हजार कोंबडीची पिल्ले, शेतीसाठीची ट्रॅक्टर अवजारे, ताडपत्र्या, पिल्लांचे खाद्य, तसेच पिल्लांच्या संगोपनासाठी उभारलेले शेड पूर्णतः जळून खाक झाले. एकूण सुमारे पाच लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. उदरनिर्वाहाचे प्रमुख साधनच नष्ट झाल्याने केदारे कुटुंबासमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. त्यामुळे शासनाने तातडीने पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# खंगलेले वैचारिक विश्व...



अलीकडेच समाजमाध्यमांवर कोणी केलेल्या तत्त्वज्ञानाच्या मांडणीवरून व त्यावर घेतल्या गेलेल्या एका आक्षेपावरून घमासान वाद झाला. अर्थातच आपल्याला त्या वादात पडायचे नाही, पण त्या पार्श्वभूमीवर जागतिकीकरणाच्या काळात झपाट्याने बदलत चाललेली सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय संस्कृती विचारवंतांच्या कितपत आकलनात आली आहे व या स्थितीने निर्माण केलेल्या अगणित प्रश्नांना व संभ्रमांना उत्तरे शोधत कालानुरूप नव्या तत्त्वज्ञानाची मांडणी करण्यात त्यांना कितपत यश आले आहे, हा खरा प्रश्न आहे. त्यावर सामाजिक चर्चा घडणे आवश्यक आहे. पण तसे होताना क्वचित दिसते, हाही जागतिकीकरणाने निर्माण केलेला गंभीर प्रश्न आहे. जागतिकीकरणामुळे जगण्याच्या अनेक गोष्टी बहुतेक समाजघटकांसाठी अगदी सोप्या बनल्या. काही घटक पुरेपूर दुर्लक्षित ठेवले गेले. तरीही या वरवरच्या सोपेपणाचे उदात्तीकरण करणारे अनेक लेखक जगभर उगवले. ते लोकप्रियही झाले. त्यांची उद्धरणे फेकण्यात काही लोक वस्ताद होऊ लागले. कोणत्याही प्रश्नाकडे गांभीर्याने पाहत चिंतन करत त्यावर काळसापेक्ष उत्तरे शोधण्याची आणि ती मांडण्याची सामाजिक सवय मोडली. जगणे सोपे बनवण्याच्या नादात आपण जगण्याचे प्रश्न जटील करत नेत आहोत याचे भान आपण गमावले. साहित्यिक-विचारवंत-मालिका आणि बव्हंशी चित्रपटांनी या प्रवृत्तीला खतपाणीच घातले. नैतिकतेच्या व्याख्याही बदलल्या. एवढेच नव्हे तर एक मोठे 'जगणे' मानवी विचारविश्वाच्या पटलावरून पुरते अदृष्य झाले. शेतकरी, पालांवरची कुटुंबे ते आदिवासी या तत्त्वचर्चेतून व कलाविश्वातून तडीपार केले गेले. म्हणजे राजकीय-सामाजिक घटकांत ती चर्चा राहिलीच नाही असे नाही, पण त्यांच्या विचारांचा आधारही आता जवळपास कालबाह्य होत चाललेले तत्त्वज्ञान राहिले. त्यातही कोणी स्वत:च्या प्रज्ञेने भर घातली, असे दिसून येत नाही. सामान्य माणसांना आपल्या जगण्याचे प्रतिबिंब पाहायला न मिळता उलट एक स्वप्नवत वाटणारा चमचमीत; पण स्वप्नील जीवनप्रवाह त्यांच्यावरही आदळत राहिला. स्वाभाविकच आपल्या प्रत्यक्ष जीवनाचे, संघर्षाचे आणि दाखवल्या जाणाऱ्या स्वप्नांचे करायचे काय, हा प्रश्न सुप्त पातळीवर, पण उद्रेकी अवस्थेत वावरत राहिला. जगण्यापासून मनाने तुटणे म्हणजे काय असते, याचे हे विदारक चित्र निर्माण होऊ लागले. जगण्याच्या व्याख्याच बदलू लागल्या.

जागतिक विचारवंत/तत्त्वज्ञही जागतिकीकरणाच्या काळातील आपली निरीक्षणे याप्रमाणेच नोंदवत राहिलेले आहेत. माणूस असंवेदनशील झाला आहे, राजकीय, सांस्कृतिक,धार्मिक,आर्थिक विचार नेत्यांपासून ते सामान्य माणसांपर्यंत उथळ पातळीवर येऊन ठेपले आहेत. नाती, ओळखी व मूल्ये घसरत अस्थायी बनू लागली आहेत, एकाकीपणा ही वैश्विक घटना बनू लागली आहे, आधुनिक तंत्रज्ञानाने नैसर्गिक विचारक्षमतेचा वेगाने ऱ्हास होतो आहे, ही निरीक्षणे व त्याच्या कारणांचा शोध घेण्याचा त्यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केला; पण कारणे शोधणे, निरीक्षणे नोंदवणे यापेक्षा महत्त्वाचे होते, ते आधुनिक मानवाला त्याच्यासमोरील वेगाने उद्भवत जाणाऱ्या समस्यांना उत्तरे देऊ शकेल असे समाजाभिमुख नव-तत्त्वज्ञान मांडणे. पण आजचा भर भांडवलशाही आणि तिच्या लाभार्थ्यांना उपयुक्त ठरेल असेच उपयुक्ततावादी तत्त्वज्ञान प्रसृत होते आहे. मुलभूत तत्त्वज्ञान गायब झालेले आहे.

गतकाळातील तत्त्वज्ञान्यांचे सिद्धांत, त्याचे सामाजिक व नैतिक परिणाम यावर भरपूर चर्चाही विद्यापीठीय पातळीवर तर कधी सामाजिक पातळीवरही होत असते. पण यात सुटलेला भाग हा की प्रत्येक तत्त्वज्ञ आपापल्या काळाचे अपत्य असतो, त्याच्या तत्त्वज्ञानावर अपरिहार्यपणे त्याच्या काळातील नैतिक समस्यांचा प्रभाव असतो; पण कोणाचेही सिद्धान्त सार्वकालिक असू शकत नाहीत, इकडे मात्र दुर्लक्ष होते. प्रत्येक व्यक्ती (त्यात राजकारणी, समाजकारणी व तत्त्वज्ञही आले) आपापल्या स्थळ-काळ सापेक्ष स्थितीत घडत असते, व्यक्त होत असते वा कृती करत असते. यात काही महान म्हणून गौरवले जातात तर काही दुर्लक्षित राहतात; पण महानांचे चिंतन अथवा वर्तन सदासर्वकाळ आजही आचरण करावे असे मार्गदर्शकच असते, असे नाही. मुळात चिरस्थायी काहीही नाही, हे न समजता आजच्या प्रश्नांची उत्तरे गतकाळात होऊन गेलेल्या महनीयांनी त्या त्या काळात दिलेल्या उत्तरांमध्ये शोधू पाहण्यात गफलत होत असते, आणि ही चूक भारतीय नेहमीच करतात हे आपल्या सहज लक्षात येईल. अनेकदा यात आत्मवंचना असते. जुन्याचा केवळ सोयीसाठी अथवा स्वत:ला भावले म्हणून गवगवा करत राहणेही, उपयुक्त ठरतेच असेही नाही..

# कशाला हवा वेलेन्टाइन डे.??

वर्षात आपण बरेच काही दिन-दिवस- आणि डेजसाजरे करत असतो. त्यातही काही डेज ची विशेष वाट बघितली जाते. जसे फ्रेन्डशिप डे, व्हेलंटाइन डे. आपली मित्रत्वाची भावना, प्रेमाची भावना प्रकट करायला त्या त्या दिवसाची वाट बघावी लागते हीच मोठी शोकांतिका आहे, असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. तरीही एकमेकांवर प्रेम असणं, आवश्यक आहे.ते नाकारता येत नाही. प्रेमाने सगळं साध्य होत, ते खोट नाही. प्रेम ही अशी भावना आहे जी व्यक्त झाल्यावर चेहरा खुलतो, बहर येतो, आणि खरंतर तसं पाहिलं तर ती भावना व्यक्त करण्यासाठी कुठल्याही ठरावीक वेळेची, जागेची, आणि दिवसाची गरज नसतेच मुळे आणि नसावी ही.

फेब्रुवारी महिना लागला की तरुण युवक -युवती मध्ये १४ फेब्रुवारीच आकर्षण असत ते व्हेलंटाइन डे च.

आताशात अनेक विवाहितां मध्येही ते असल्याचे दिसते.

मग कुठे जायचं, कुठे भेटायचं, गिफ्ट काय घ्यायच, जेवणाचा कार्यक्रम कुठे? सगळं ठरत असत. पण हा प्रेम व्यक्त करण्याचा दिवस व्हेलंटाइन डे म्हणून साजरा का केला जातो? का करतो, ह्या विषयी कोणालाही काही माहिति नसते.

सगळ्यांनाच माहीत व्हावा म्हणून व्हेलंटाइन डे विषयी जाणून घेऊ.

रोम मध्ये क्लाडिअस नावाचा राजा होता. तो शिस्तप्रिय, कठोर होता. तसा क्रुरही होता. त्याची काही तत्व होती, ती वेगळी होती. त्याच्या मते प्रेम आणी लग्न माणसाला कमजोर करतात. कामावरून त्यांच लक्ष उडत. युध्दात चांगले लढू शकत नाही. कुटुंबाची चिंता असते. त्याने आपल्या सैनिकांना प्रेम, लग्न न करण्याचा फतवा काढला होता. अर्थातच तो सर्वात मान्य नव्हता. त्याच राज्यात एक संत रहात होते. त्यांच नाव व्हेलंटाइन होते. जनतेवर हा अन्याय आहे. तो त्यांना मान्य नव्हता. आणि म्हणूनच त्यांनी काही प्रेमिकांची लपूनछपून लग्न लाऊन दिली होती. अर्थातच ही गोष्ट लपून राहणे शक्यच नव्हती. राजाच्या कानावर गेलीच. आपल्या आदेशानुसार न झाल्याने, व्हेलंटाइनला मृत्यूदंड देण्यासाठी आदेश दिला. कारागृहात त्याची रवानगी झाली.

कारागृहात जेलरच्या मुलीची दृष्टी त्यांनी परत आणून दिली. त्यामुळे मुलीत आणि त्यांच्यात जवळीक झाल्याने, प्रेम निर्माण होते.व्हेलंटाइन मृत्यदंडाचे आधी एक प्रेमपत्र तिला लिहितो. आणि निरोप घेतो. त्यात तुझा व्हेलंटाइनम्हणून सांगता करतो. तोच हा १४ फेब्रुवारीचा व्हॅलेंटाईनचा सेट द व्हॅलेंटाईनचा पुण्यतिथीचा दिवस व्हॅलेंटाईन डे त्याचे नावे साजरा होतो. सगळयांनाच सविस्तर माहीत व्हावे हा उद्देश.

भारतात ही मोठया प्रमाणात प्रेमीं जनांकडून हा दिवस साजरा होतो. आपल्या प्रिय व्यक्तीला, शुभेच्छा पत्र, गुलाब पुष्प, भेट वस्तू देऊन आपल्या प्रेमभावना व्यक्त करतात. करायला हव्यात. प्रेमी कोण? सर्वच असतात. प्रत्येकाचे मनात कोणा न कोणाबद्दल प्रेम हे असतच. मनात प्रेमभावना नाही अशी व्यक्ती सापडणे नाही.

आनंदात असणे प्रेम असते. आनंदाने, हसणे, हसवणे प्रेम असते. गुलाबाचे फुल देणे हेसुद्धा प्रेम असते. एकमेकांना जपणं हे पण प्रेम असते. एकमेकाला नेहमी सावरणं हे पण प्रेम असते.

मित्र-मित्रात, मित्र-मैत्रिणीमध्ये, पति-पत्नी मध्ये, प्रियकर -प्रेयसी मध्ये आई-वडील -मुलामध्ये प्रेम असत. अर्थातच प्रत्येकाची प्रेमाची भावना निराळी असते.




अपेक्षा निराळ्या असतात. प्रेमाला वयाच बंधन नसत.

आपल्यावर कोणी प्रेम करतय, आपल कोणावर तरी प्रेम आहे, ही भावनाच अतिशय सुखद असते, मनाला आनंद देणारी असते. आपल्या जगण्याला बळ देणारी असते.

**आवडल कोणी**<br>
**तर वेड होऊन जावं**<br>
**बेधुंद होऊन प्रेम करावं**<br>
**फुला सारखं जपावं**<br>
**प्रेमासाठी जगणं व्हावं**<br>
**वेड होऊन प्रेम करावं...**

पण आज सगळ्याच गोष्टींचे अर्थ बदलत चालले आहे. प्रेम म्हणजे नक्की काय? की आकर्षणातून दोघे जवळ येतात. हे हि महत्त्वाचे ठरते. अनेकदा दोघे, फेसबुक, वॉटसाप, इन्स्टाग्राम माध्यमातून जवळ येतात. काही वेळा नको इतकी जवळीक साधली जाते, आणि नको ते प्रसंगाना सामोरे जावे लागते.आत्महत्या, हत्या, असे अनेक प्रसंग येतात.. आयुष्य उद्ध्वस्त होतात... हे नकोय. मैत्रीतून एक सुंदर नातं निर्माण व्हावं. विचारांची देवाणघेवाण व्हावी.


**दिलीप देशपांडे**<br>
**जामनेर. जि.जळगांव**<br>
**मोबा. ८९९९५६६९१७**

पण बऱ्याचदा तसे होत नाही आणि म्हणूनच व्हेलंटाइन डे ला अनेकांन कडून विरोध होतो, तो यामुळेच.

आता तर पूर्ण आठवडाच व्हेलंटाइन डे आठवडा साजरा करण्याचा प्रघात आलाय.रोज डे, प्रपोज डे, चॉकलेट डे, टेडी डे, प्रॉमिस डे, हग डे, किस डे, आणि व्हेलंटाइन डे, असा आठवडा. आपल्या प्रियकराला गुलाब पुष्प देणे, भावना व्यक्त करणे, वचन देणे, चॉकलेट, भेटवस्तू देणे, मिठी मारणे, किस करणे, असे प्रकार येतात, जे आपल्या संस्कृतीत नाही बसत ह्या सगळ्या गोष्टी. म्हणूनच विरोध होतो. खरं प्रेम व्यक्त करायला ह्या सगळ्याची आवश्यकता आहे का? हा प्रश्न. का उगीचच असे प्रकारातून आपल प्रेम जगाला दाखवायचे. संधी साधू प्रेम नकोय.

प्रेम जरूर करा, प्रेमात, आणि प्रेमाने सगळं व्यवस्थित चाललय. प्रेम शब्दाला कमीपणा येईल असे कृत्य करू नका.. प्रत्येकाने प्रेमात रहा...

आणि हा दिवस प्रेम व्यक्त करण्याचा प्रेम ाचा दिवस म्हणून साजरा करा. संयमाने. एकच दिवस नाही तर सतत प्रेमात रहा... रोजचाच दिवस प्रेममय असूद्या...

पाडगावकर आपल्या कवितेत म्हणतात -

**प्रेम कधी रुसणं असतं,**<br>
**डोळ्यांनीच हसणं असतं,**<br>
**प्रेम कधी भांडत सुध्दा !**<br>
**दोन ओळींची चिठ्ठीसुध्दा प्रेम असतं,**<br>
**घट्टमिठी सुध्दा प्रेम असत**<br>
**मग सांगा,**<br>
**प्रेम म्हणजे नक्की काय असतं.?**<br>
**प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे काय असतं ?**<br>
**प्रेम म्हणजे.. प्रेम.. असतं.**

**प्रेम व्यक्त करायला आठवड्याचे..**<br>
**दिवसाचे बंधन कशाला हवे.?**

## कॉपीमुक्त

टाळ्या घेणारे वाक्य<br>
कॉपीमुक्त हो परिक्षा<br>
खडतर अत्यंत रस्ता<br>
रास्त असूनि अपेक्षा

संपूर्ण शिक्षण पद्धत<br>
आधिकरावी समिक्षा<br>
सरळवाट शिकवावी<br>
शुध्द ज्ञानार्जन दिक्षा

जिवघेणीटक्केस्पर्धा<br>
भल्यांची उडवी नक्षा<br>
अजूनि मिळावे मार्क<br>
हव्यास लागे बुभुक्षा

मागेपडला परिक्षार्थी<br>
सर्व थरा चाले उपेक्षा<br>
वाममार्ग छात्र पत्करे<br>
कठिण अभ्यासापेक्षा

सामुहिककॉपीप्रकार<br>
न कष्टता मिळे भिक्षा<br>
अल्पशा घडता चुका<br>
आयुष्यभर का शिक्षा

दुराचारटाळण्यासाठी<br>
तपासू पहावी व्यपेक्षा<br>
मुल्यांकनार्थ रे परिक्षा<br>
ना अति महत्वाकांक्षा

ऐरणीवर ही समस्या<br>
नाजूक मनाचीसुरक्षा<br>
आमुलाग्र बदल हवा<br>
अ सह्य उत्तर प्रतिक्षा

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**<br>
**९७३०३०६९९६**

# अजब प्रेम की, गजब कहाणी..!!

सकाळची वेळ होती.चहाची नव्हे मला पेपर वाचण्याची सवय होती. वर' पाहिजे जाहिरात होती नजर काही केल्या हटल नव्हती त्याला कारणेही तशीच होती. शिक्षणाची अट नव्हती. कागदपत्रांची पूर्तता नव्हती हुशार, तरुण, कर्तबगार, प्रेमळ तशीच काहीतरी मला जुळणारी सगळी माहिती त्यात ठासून भारलेली होती आणि शेवटी पाहतो तर काय प्रियांकाची सही होली त्वरित भेटा एकाच जागेसाठी धडपड होती.वेळ लावायची गरज नव्हती मुंबई ही मी बघितली (पाहिली) नव्हती. काय विचारता प्रियांका चोप्राच्या घरासमारील गर्दी. कोल्हापूरच्या श्री. आंबाबाईच्या देवळात कमी पण त्यापेक्षाही जास्त गर्दी तिथे होती सिक्युरिटीची पण व्यवस्था होती पण.... मुलाखत देऊन बाहेर पडणाऱ्यांची मात्र देवदासमधल्या शाहरूख खानसारखी अवस्था होती. मी तरआशाच सोडली होती. लॉटरी लागली तसा म झा लाखातून नंबर आला. का घेत होती सखपरीक्षा? जो या तरुणांपैकी एकही उत्तीर्ण न झाला. सवाल तिचा लाथवी आवाजात जेव्हा माझ्यासमोर आला तिचा तो निरागस चेहरा, मधुर हास्य पाहून माझा कलीजा खलास झाला. सवालाकडे कोणाचे ना लक्ष होते. उत्तर देण्याचे भानच नव्हते अपेक्षित प्रतिसाद नसल्यामुळे तिने मला निघण्याचा इशारा दिला पण जाता जाता. तिने एक प्रश्न विचारला मी कोण....?



क्षणाचाही विलंब न लावता मी जबाब दिला... प्रियांका शिवाजी चौगुले. निकालाची अपेक्षा नव्हती, पण अनपेक्षित निकाल लागला गुलाब फुलावा तसा तिचा चेहरा फुलला माझ्या जीवनाचा टर्निंग इथेच ठरला. महालक्ष्मी, सिद्धिविनायकला घालून साकडे सरळ मुंबईवरून लोकरे बंधूनच्या आरामदाई म हालक्ष्मी ट्रॅव्हल्स ने गाव गाठले. टीव्हीवरील प्रियांका गावात बघून आम्हा दोघांची जोडी प्रत्येकाला पडली कोडी. टीव्हीवरील प्रियांका गावात होती तीच आता कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील मासा बेलेवाडीकर झाली होती.

प्रियांका...तुझ्या सोबतीचा प्रत्येक क्षण विलक्षण असतो आज फक्त निमित्त आहे. तुझ्या प्रीतीतला प्रत्येक दिवस माझा व्हॅलेंटाईनडेचं असतो.

**....आय लव्ह यु.. प्रियांका**

**- ह.भ.प. शिवाजी विठ्ठल चौगुले**<br>
**कागल कोल्हापूर**

# कपड्यांवर 'ॐ नम: शिवाय' नको!

महाशिवरात्रीच्या १५ दिवस आधीपासूनच ऑनलाईन तयार कपडे विकणाऱ्या समस्त संकेतस्थळांवर 'ॐ नम: शिवाय ।' लिहिलेले शर्ट्स, शॉर्ट आणि लॉन्ग कुर्ते, टी शर्ट निरनिराळ्या रंगांत विक्रीसाठी उपलब्ध केले जातात. महाशिवरात्री निमित्त या कपड्यांवर विशेष सवलतही दिली जाते. दुकानांमध्येही असे कपडे सर्वांना दिसतील असे दर्शनी भागात मांडले जातात. अशाच प्रकारचे दृष्य श्रावण मासातही पाहायला मिळते.

या प्रकारच्या कपड्यांना या दिवसांत प्रचंड मागणी असते. बारा ज्योतिर्लिंग तसेच भगवान शिवाची पुरातन मंदिरे ज्या ठिकाणी आहेत अशा ठिकाणी या स्वरूपाच्या कपड्यांचे स्टॉल्स पाहायला मिळतात. प्राचीन शिवमंदिराच्या ठिकाणी भरणाऱ्या जत्रांमध्ये सुद्धा 'ॐ नम: शिवाय ।' मंत्रजप प्रिंट केलेले कपडे विक्रीसाठी ठेवलेले दिसून येतात, ज्यांना तरुणवर्गाकडून अधिक पसंती दिली जाते. अंगभर ॐ नम: शिवाय । हा मंत्रजप लिहिलेले सदरे परिधान करण्याची आता जणू फॅशनच येत चालली आहे. जीन्स पॅन्टवर अशा प्रकारचे सदरे घातलेले तरुण-तरुणी हल्ली सर्वत्र पाहायला मिळतात. 'ॐ नम: शिवाय ।' हा भगवान शिवाचा मंत्रजप असून याच्या नियमित स्मरणाने शिव प्रसन्न होऊन



आपली मनोकामना पूर्ण करतो असे म्हटले जाते. यामध्ये ओम हा बीजमंत्र असल्याने या मंत्रात शक्तीही तेव्हढ्या प्रमाणात सामावलेली असते. त्यामुळे तो श्रद्धेने स्मरावा असे धर्मशास्त्र सांगते. धर्मशास्त्रानुसार ज्या ठिकाणी देवतेचे नाम अथवा प्रतिमा असते त्या ठिकाणी त्या देवतेचे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध आणि त्या देवतेची शक्ती कार्यरत असते. ॐ नम: शिवाय श्र सारख्या या शक्तिशाली मंत्राचा हल्ली कपड्यांवर होत असलेला सुमार वापर मनाला खटकणारा आहे.

मंत्रजप प्रिंट केलेले कपडे परिधान करून आपण आवश्यक ती शुचिर्भूतता पाळतो का ? अशा प्रकारचे कपडे परिधान करून आपण कोणत्याही अपवित्र स्थळी जात असू, मद्यपान, धूम्रपान करत असू, मुक्तपणे वावरत असू तर तो प्रत्यक्ष शिवाचाच अवमान आहे. अंगाला येणाऱ्या घामामुळे घातलेल्या कपड्यांना दुर्गंध येऊ लागतो. असे कपडे अन्य कपड्यांसोबत धुतांनाही आपण विशेष काळजी घेत नाही. एकीकडे आपली शिवभक्ती दाखवण्यासाठी अशा प्रकारचे कपडे घालायचे आणि दुसरीकडे प्रत्यक्ष शिवाचाच अवम ान करायचा अशाने शिवाची कृपा आपल्यावर होईल का ? भक्ती ही मनापासून करावी, त्यासाठी हिंदू धर्मात अनेक मार्ग सांगण्यात आले आहेत. अशा प्रकारे मंत्रजपाचे कपडे परिधान करून आपल्या भक्तीचा देखावा करू नये. अशा प्रकारचे कपडे तयार करून ते विक्रीसाठी ठेऊन व्यापारी वर्ग आपला व्यवसाय वाढवू पाहतात आणि आपल्यासारखे भगवान शिवाचे भक्त हे कपडे चढ्या दरात विकत घेतात. त्यामुळे भगवान शिवाचा मंत्रजप प्रिंट केलेले कपडे विकत घेणे आणि ते परिधान टाळायला हवे. त्याऐवजी ॐ नमः शिवाय हा मंत्रजप महाशिवरात्रीच्या दिनी, प्रत्येक सोमवारी अधिकाधिक करायला हवा. ज्यामुळे भगवान शिवांची अखंड कृपा आपल्यावर राहिल.

**- सौ. मोक्षदा घाणेकर,**<br>
**काळाचौकी, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## खापरखेडा परिसरात 'गौ सेवेचा' संकल्प

### नवीन बिना येथे गौशालेचे थाटात उद्घाटन



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१२, नागपूर :** खापरखेडा परिसरातील मोकाट जनावरांची समस्या आणि वाढती गौ तस्करी रोखण्यासाठी एक कौतुकास्पद पाऊल उचलण्यात आले आहे. विश्व हिंदू परिषद रामटेक जिल्हा उपाध्यक्ष अमोल कळंबे यांच्या संकल्पनेतून नवीन बिना भानेगाव येथे एका सुसज्ज गौशालेची निर्मिती करण्यात आली असून ११ फेब्रुवारी बुधवारला गौशालेचे थाटामाटात उद्घाटन करण्यात आले.

गेल्या काही काळापासून खापरखेडा आणि परिसरात मोठ्या प्रमाणात मोकाट जनावरे रस्त्यावर ठाण मांडून बसलेली दिसत होती. याच संधीचा फायदा घेत गौ तस्करीच्या घटनांमध्येही वाढ झाली होती ही बाब लक्षात घेऊन विश्व हिंदू परिषदेचे रामटेक जिल्हा उपाध्यक्ष अमोल कळंबे यांनी स्वतःच्या मालकीच्या जागेवर या गौशालेची उभारणी केली

सदर गौशालेत पशूंच्या आरोग्याचीही काळजी घेतली जात आहे. सध्या गौशालेमध्ये अपघातात गंभीर जखमी झालेल्या एका वासरावर तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू आहेत, शिवाय इतर दोन गौमाता आहेत. गौशालेत चाऱ्याची चोख व्यवस्था करण्यात आली आहे. भविष्यात जखमी आणि निराश्रित जनावरांसाठी ही गौशाला एक आधारवड ठरणार आहे.

गौशालेच्या उदघाटन प्रसंगी आकर्षक सजावट करण्यात आली होती. यावेळी फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करण्यात आली, शिवाय महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमामुळे अमोल कळंबे यांच्यावर सर्वच स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून गौ सेवेचा हा आदर्श इतरांसाठीही प्रेरणादायी ठरणार आहे.

## अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील यांची भंडारा जिल्हाधिकारी कार्यालयात बदली




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१२, चंद्रपूर :** चंद्रपूर महानगरपालिकेतील अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील यांची बदली होऊन ते सह आयुक्त गट-अ, जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा येथे रुजू झाले आहेत. त्यांच्या बदलीनिमित्त चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला.

चंदन पाटील यांनी ३ मे २०२३ मध्ये चंद्रपूर महानगरपालिकेत अतिरिक्त आयुक्त म्हणून कार्यभार स्वीकारला. त्यांच्या कार्यकाळात त्यांना देण्यात आलेल्या अनेक विभागांची जबाबदारी अत्यंत नियोजनबध्द पध्दतीने पार पाडली. प्रशासकीय कामकाजात कार्यकुशलता, वेळेचे भान व निर्णयक्षमता यामुळे त्यांनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये विश्वास व प्रेरणा निर्माण केली. त्यांच्या कार्यकाळात सामान्य आस्थापना विभाग, जनगणना, पाणीपुरवठा, बांधकाम, लेखा विभाग, पीएम ई बस योजना अशा विविध उपक्रमांना गती मिळाली. त्यांचेया नियोजनबध्द कार्यपध्दतीमुळे निवडणूक प्रक्रीया शांततापूण व यशस्वीरित्या पूर्ण होण्यास मोठी मदत झाली.

निरोप समारंभात आयुक्त अकुनूरी नरेश यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात उपायुक्त संदीप चिद्रवार, मुख्य लेखा पराक्षक मनोज गोस्वामी, शहर अभियंता रवींद्र हजारे, नगर सचिव नरेंद्र बोबाटे, सहायक आयुक्त शुभांगी सूर्यवंशी सहायक आयुक्त संतोष गर्गेलवार,सहायक आयुक्त अनिलकुमार घुले यांच्यासह मनपाचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## २८ लाखांचे ७० तराफे जाळून नष्ट

### नेवासा बुद्रुक येथे अवैध वाळू उपशावर महसूल विभागाची धडक कारवाई



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१२, नेवासा (अहिल्यानगर) :** जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांच्या सक्त सूचनांनुसार नेवासा महसूल विभागाने अवैध वाळू उपशाविरोधात धडक मोहीम राबवत नेवासा बुद्रुक येथील नदीपात्रात मोठी कारवाई केली. या कारवाईत वाळू उपशासाठी वापरण्यात येणारे तब्बल ७० अवैध तराफे/चप्पू जप्त करून जाळून नष्ट करण्यात आले. दिनांक ११ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजल्यापासून मध्यरात्री ०१:०० वाजेपर्यंत विशेष 'सर्च ऑपरेशन' राबविण्यात आले. नदीपात्रातून वाळू उपसा करण्यासाठी वापरले जाणारे साहित्य जप्त करून नदीकाठावर आणण्यात आले व तेथेच नष्ट करण्यात आले.

प्रत्येक तराफ्याची अंदाजे किंमत ४० हजार रुपये असून एकूण सुमारे २८ लाख रुपयांचा मुद्देमाल या कारवाईत नष्ट करण्यात आल्याची माहिती महसूल विभागाने दिली. नदीपात्रातील कारवाईसाठी श्रीरामपूर येथून विशेष बोट व पथक पाचारण करण्यात आले होते. त्यांच्या मदतीमुळे ही मोहीम प्रभावीपणे पार पडली.

ही कारवाई उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रभारी तहसीलदार हिमालय घोरपडे यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत व नेतृत्वाखाली करण्यात आली. अवैध गौण खनिज उत्खनन व वाळू तस्करी कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नाही. पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या घटकांवर प्रशासनाची करडी नजर असून यापुढेही कठोर कायदेशीर कारवाई सुरूच राहील, असा इशारा महसूल विभागाकडून देण्यात आला आहे.

## डहाणू व तलासरी येथे माकपा व महाविकास आघाडीची चार श्रमसंहितांविरोधात जोरदार निदर्शने



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१२, डहाणू (पालघर) :** भारताच्या कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) तसेच महाविकास आघाडीच्या वतीने आज डहाणू आणि तलासरी येथे भाजप सरकारच्या धोरणांविरोधात जोरदार निदर्शने करण्यात आली. केंद्र सरकारने लागू केलेल्या चार श्रम संहिता कायद्यांविरोधात आणि कामगार-शेतकरी विरोधी निर्णयांच्या निषेधार्थ आंदोलन करण्यात आले.

यावेळी भाजप सरकारच्या निषेधार्थ प्रतीकात्मक पुतळा दहन करण्यात आले. आंदोलनकर्त्यांनी सरकारच्या धोरणांविरोधात जोरदार घोषणा देत आपला संताप व्यक्त केला. चार श्रमसंहितांमुळे कामगारांचे हक्क कमी होत असून, कंत्राटीकरणाला प्रोत्साहन मिळत आहे, असा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

तसेच भारतातून अमेरिकेत जाणाऱ्या मालावर १८% कर लावण्यात येणार असून अमेरिकेतून भारतात येणाऱ्या मालावर ०% कर आकारला जाणार असल्याच्या निर्णयाविरोधातही तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. या धोरणामुळे देशांतर्गत उद्योग, लघुउद्योग व शेतकऱ्यांचे नुकसान होईल, असा इशारा देण्यात आला.

या आंदोलनात माकपाचे केंद्रीय कमिटी सदस्य तथा आमदार विनोद निकोले उपस्थित होते. त्यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन पार पडले.

यावेळी माकपाचे डहाणू तालुका सेक्रेटरी कॉ. रडका कलंगडा, कॉ. चंद्रकांत घोरखाना, लहानी दौंडा, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) तन्मय बारी, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) काकडे साहेब, संजय पाटील, कष्टकरी संघटनेचे ब्रायन लोबो, मधुबाई धोंडी, राष्ट्रीय काँग्रेस पार्टीच्या वर्षा वायेडा तसेच तलासरी तालुका सेक्रेटरी कॉ. लक्ष्मण डोंभरे, कॉ. नंदकुमार हडळ, कॉ. सुनीता शिंगडा, कॉ. गुलाब वाडिया, कॉ. विजय बोंदले आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## यूजीसी रेग्युलेशन ॲक्ट २०२६ च्या समर्थनार्थ, आंबेडकरी संस्कृत चळवळीचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन




**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१२, राहुरी :** आम्ही भारताचे लोक आंबेडकरी संस्कृत चळवळीच्या वतीने अहिल्यानगर येथील जिल्हाधिकाऱ्यांना विद्यापीठ अनुदान आयोग (णऋउ) रेग्युलेशन ॲक्ट २०२६ च्या समर्थनार्थ निवेदन सादर करण्यात आले.

उच्च शिक्षण संस्थांमध्ये जात, धर्म, लिंग, जन्मस्थान, अपंगत्व आदी आधारावर होणारा भेदभाव रोखण्यासाठी यूजीसी रेग्युलेशन ॲक्ट २०२६ अत्यंत आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. शैक्षणिक वातावरण अधिक समताधिष्ठित, सुरक्षित व न्याय्य करण्यासाठी या कायद्याची प्रभावी व काटेकोर अंमलबजावणी करणे गरजेचे असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

निवेदनात पुढे नमूद करण्यात आले की, २०१२ मधील भेदभावविरोधी नियमांची प्रभावी अंमलबजावणी झाली असती, तर रोहित वेमुला व पायल तडवी यांसारख्या कर्तृत्ववान विद्यार्थ्यांना आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलावे लागले नसते. या दुर्दैवी घटनांनी देश हादरला असून भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी यूजीसी रेग्युलेशन ॲक्ट २०२६ आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

तसेच या कायद्यामागे कोणत्याही सर्वसाधारण वर्गातील विद्यार्थ्याला गुन्हेगार ठरवण्याचा हेतू नसून आवश्यक त्या दुरुस्त्यांसाठी तज्ज्ञांच्या माध्यमातून सखोल चर्चा करून सुधारणा करण्यात याव्यात, तसेच शैक्षणिक संस्थांमधील भेदभाव पूर्णतः थांबवावा, अशी ठाम मागणी निवेदनातून करण्यात आली.

निवेदन देताना आम्ही भारताचे लोक आंबेडकरी संस्कृत चळवळ, अहिल्यानगर जिल्हा कार्यकारिणी सदस्य संदीप जाधव, दिनेश गायकवाड, आप्पासाहेब रणनवरे, राजेंद्र मगर, किशोर चक्रनारायण व विनायक जाधव आदी उपस्थित होते.

## दिव्यांग रवींद्र वलोकर आता होणार 'स्वयंपूर्ण' ; खापरखेड्यात फुड कार्टचे वाटप




> "शासनाच्या योजना कागदावर न राहता त्या गरजूंच्या दारापर्यंत पोहोचवणे हेच आमचे ध्येय आहे. रवींद्र सारख्या जिद्दी तरुणाला व्यवसायाचे साधन उपलब्ध करून देताना मनाला समाधान वाटत आहे दिव्यांग बांधवांनी कोणापुढे हात न पसरता सन्मानाने जगावे यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
>
> **- आशिष फुटाने, माजी जिल्हाध्यक्ष, भाजयुमो**

> "माझ्यासारख्या सामान्य दिव्यांग व्यक्तीला स्वतःचा व्यवसाय सुरू करता येईल असे वाटले नव्हते पण शासनाच्या योजनेमुळे आणि आमदार डॉ आशिष देशमुख व आशिष फुटाने यांच्या प्रयत्ना मूळे मला फुड कार्ट मिळाले. मी आता सन्मानाने माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करू शकतो फूड कोर्ट योजना दिव्यांग बांधवांसाठी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानतो.
>
> **- रवींद्र वलोकर, लाभार्थी**

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१२, नागपूर :** दिव्यांग बांधवांसाठी महाराष्ट्र शासनाचा संजीवनी.. एक हात मदितीचा हा उपक्रम खऱ्या अर्थाने वरदान ठरत आहे समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद नागपूर यांच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या या योजनेच्या माध्यमातून खापरखेडा येथील रवींद्र वलोकर या दिव्यांग तरुणाला स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी 'फूड कार्ट' उपलब्ध करून देण्यात आले आहे. सावनेर-कळमेश्वर विधानसभा क्षेत्राचे आमदार डॉ.आशिष देशमुख व भाजयुमोचे माजी जिल्हाध्यक्ष आशिष फुटाने यांच्या विशेष पाठपुराव्यामुळे रवींद्रला हे साहित्याचे वाटप करण्यात आले.

एका छोटेखानी कार्यक्रमात फुड कार्ट नुकतेच सुपूर्द करण्यात आले. यामुळे रवींद्रच्या आयुष्याला आता नवी दिशा मिळाली असून दिव्यांग बांधवा मध्ये एक आशेचे किरण निर्माण झाले आहे. महाराष्ट्र शासनाचा संजीवनी.... एक हात मदतीचा हा उपक्रम समाज परिवर्तनाचे एक महत्त्वाचे पाऊल ठरत आहे.

## खापरखेडा परिसरात मंदिरांच्या दानपेट्या फोडणारा चोरटा जेरबंद



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि १२, नागपूर :** खापरखेडा येथील रेल्वे चौकी जवळील मातामाय मंदिर आणि चनकापूर येथील महालक्ष्मी मंदिरातील दानपेट्या फोडून रोख रक्कम लंपास करणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला खापरखेडा पोलिसांनी २४ तासांच्या आत अटक केली आहे. पोलिसांनी त्याच्याकडून चोरीला गेलेली रोख रक्कम आणि गुन्ह्यात वापरलेले साहित्य जप्त केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ६ फेब्रुवारीच्या रात्री खापरखेडा येथील मातामाय मंदिराच्या चॅनल गेटचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने दानपेटीतील १२ हजार रुपये चोरून नेले होते. त्यानंतर ११ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास चनकापूर येथील महालक्ष्मी मंदिराचे कुलूप तोडून दानपेटीतील १५ हजार रुपये लंपास करण्यात आले. या दोन्ही घटनांमुळे परिसरात खळबळ उडाली होती.

सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी तपास चक्रे फिरवली. फुटेजमध्ये दिसणाऱ्या वर्णनाचा व्यक्ती चिचोली नदीच्या परिसरात फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी त्याला ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला असता त्याने पळ काढला, मात्र पाठलाग करून पोलिसांनी त्याला पकडले. आकाश तुळशीराम चवरे (वय ३० वर्षे, रा. नहरपट्टा खापरखेडा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसी खाक्या दाखवताच आरोपीने दोन्ही मंदिरांतील चोरीची कबुली दिली. त्याने चोरलेली रक्कम चिचोली गावाबाहेरील नदीकाठी झाडीझुडपात लपवून ठेवली होती. पोलिसांनी त्याच्याकडून: पहिल्या गुन्ह्यातील ३,१९१ रुपये आणि लोखंडी टामी. दुसऱ्या गुन्ह्यातील ११,२१३ रुपये.असा एकूण १५,६०४ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर कारवाई नागपूरचे पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल, सह-पोलीस आयुक्त अश्विन रेड्डी, उपायुक्त डॉ. संदीप पखाले यांच्या मार्गदर्शनाखाली खापरखेडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिश रुमकर, पोलीस उपनिरीक्षक विलास करंगामी आणि त्यांच्या पथकाने केली आहे.

# पनवेल मनपा महापौरांनी व उपमहापौरांनी स्वीकारला पदभार

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१२, पनवेल :** महानगरपालिकेचे नवनिर्वाचित महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील यांनी आज दिनांक १२ फेब्रुवारी रोजी अधिकृतरित्या मुख्यालयातील महापौर व उपमहापौर दालनाचा पदभार स्वीकारला. यावेळी ज्येष्ठ नेते माजी खासदार रामशेठ ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे.एम म्हात्रे, वाय टी, देशमुख, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, भारतीय जनता पक्षाचे सर्व महापालिका सदस्य, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापौर व उपमहापौरांनी पदभार स्वीकारताच आज मालमत्ता कर, पाणीपुरवठा, शिक्षण विभाग, अतिक्रमण विभाग या अनुषंगाने विविध विषयांवरती आढावा बैठक घेतली.या बैठकीस सर्व महापालिका सदस्य, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, अतिरिक्त आयुक्त महेशकुमार म



ेघमाळे, उपायुक्त स्वरूप खारगे, उपायुक्त नानासाहेब कामठे, शहर अभियंता संजय कटेकर, सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर, डॉ.रूपाली माने, शिक्षणाधिकारी रम ेश चव्हाण, महापालिका अधिकारी उपस्थित होते.म हापालिका क्षेत्रात पाण्याचा मोठा प्रश्न भेडसावतो आहे.

खारघर, कामोठे, ग्रामीण भाग, कळंबोली, अशा सर्वच ठिकाणी पाण्याची कमतरता जाणवत आहे. यावरील उपाय योजनेवरती यावेळी चर्चा करण्यात आली. या अनुषंगाने महाराष्ट्र जलप्राधिकरण, सिडको, शिलार प्रकल्प, भविष्यकालीन मागणी, यासर्वांवर यावेळी चर्चा करण्यात आली. महापालिका कामोठे व तळोजा याठिकाणी नवीन शाळा बांधणार आहे. याचबरोबर खारघर, कळंबोली, ग्रामीण भाग, नवीन पनवेल अशा नवीन चार शाळा बांधण्याच्या विषयांवर यावेळी चर्चा झाली.अतिक्रमण विभागाच्या माध्यमातून आठवडा बाजारांवर जोरदार कारवाई करावी अशा सूचना उपस्थित सदस्यांनी यावेळी केल्या.

अतिक्रमण कर्मचारी वाढवून त्यासाठी वाहने घेऊन कारवाई करावी अशा सूचना यावेळी सदस्यांनी दिल्या. नोड निहाय बैठका घेऊन यावर कठोर कारवाई करण्याबाबत अधिकाऱ्यांना सूचित करण्यात आले.

# हात फ्रॅक्चर वडिलांचे छत्र हरपले; तरीही 'मै झुकेगा नाही' म्हणणारा मंद्रूपचा पैलवान!

## ऑल इंडिया चॅम्पियन सागर शेजाळची जिद्दीची प्रेरणादायी कहाणी...

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.१२, सोलापूर :** गरिबी, वडिलांचे अकाली निधन, हाताला फ्रॅक्चर संकटांची मालिकाच समोर उभी राहिली; पण तरीही मै झुकेगा नाही म्हणत कुस्तीच्या मैदानात झुंज देणारा मंद्रूपचा पैलवान म्हणजे सागर मारुती शेजाळ. ऑल इंडिया चॅम्पियन, महाराष्ट्र चॅम्पियन आणि कुमार महाराष्ट्र केसरी स्पर्धेत झळकलेला हा पैलवान आजही संघर्षातूनच आपली वाटचाल करत आहे.

**वारसा नसतानाही कुस्तीची ओढ:**

घरात कुस्तीचा वारसा नसतानाही लहानपणापासून सागरला कुस्तीची प्रचंड आवड. त्याच्या मेहनतीच्या जोरावर त्याची राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आणि मंद्रूपच्या नावाला राष्ट्रीय पातळीवर ओळख मिळाली.

**वडिलांचे निधन; आई-भावांनी सांभाळली जबाबदारी :**

मंद्रूप पोलीस ठाण्यात साफसफाई कामगार म्हणून काम करणारे वडील मारुती शेजाळ यांचे ३० जुलै २००८ रोजी अपघाती निधन झाले. त्या वेळी घरावर दुःखाचा डोंगर कोसळला. आई लक्ष्मी शेजाळ आणि मोठे भाऊ



सोमनाथ व कृष्णा यांनी कष्ट उपसत सागरच्या स्वप्नांना आधार दिला.

**गुरूंचे मार्गदर्शन आणि शिक्षणाला साथ :**

सागरची जिद्द पाहून मा. गुरुसिद्ध म्हेत्रे यांनी स्वतःच्या खर्चाने त्याला फडात उतरवले. पाचवी ते बारावीपर्यंतचे शिक्षण लोकसेवा विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात झाले. प्राचार्य श्रीधर टिळे, नंदकुमार टिळे आणि प्रसाद शेंडगे यांनी शिक्षणाचा खर्च उचलत त्याला साथ दिली.

**विभागीय ते राज्यस्तरावर चमक :**

पुणे विभागीय शालेय कुस्ती स्पर्धे त सागरने सलग तीन वेळा प्रथम क्रम ांक पटकावला. कुमार महाराष्ट्र केसरी आणि खाशाबा जाधव स्पर्धेतही त्याने दमदार सहभाग नोंदवला.

**पोलीस अधिकाऱ्यांची आर्थिक मदत :**

मंद्रूप पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक अजित त्रिपुटे व संदीप धांडे यांनी सागरला सातत्याने आर्थिक मदत आणि मार्गदर्शन केले.

**पुण्याच्या तालमीत नवे पर्व :**

भारतीय रेल्वेचे कुस्तीपटू आबासाहेब उर्फ बापू मदने यांनी २०१० साली सागरला पुण्यातील आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुलात काकासाहेब पवार यांच्या तालमीत दाखल केले. तेव्हापासून त्याच्या कारकिर्दीला नवी दिशा मिळाली.

**फ्रॅक्चरनंतरही जिद्द कायम :**

२०१९ मध्ये कुस्ती खेळताना सागरच्या डाव्या हाताला फ्रॅक्चर झाले. पुण्यातील भारतीय हॉस्पिटलमध्ये तब्बल वर्षभर उपचार झाले. सर्व खर्च आबासाहेब मदने यांनी केला. पण या काळातही सागरचा सराव थांबला नाहीमै झुकेगा नाही हीच त्याची जिद्द!

**खुराकासाठी संघर्ष :**

मंद्रूपचे राधा ज्वेलर्सचे सतीश वेर्णे कर गेली ३ वर्षे सागरला दरमहा पाच हजार रुपये खुराकासाठी देत आहेत. तरीही उदरनिर्वाह आणि सरावाचा खर्च भागवण्यासाठी सागरला मोठा संघर्ष करावा लागत आहे. गावोगावी यात्रांमधील कुस्ती मैदानात खेळून मि ळणाऱ्या बक्षिसांतून तो वर्षभराचा खर्च साठवतो.

**लोकसहभागाची गरज :**

मंद्रूपमध्ये उभारलेल्या भव्य आखाड्यामुळे अनेक पैलवान घडले; मात्र आर्थिक अडचणींमुळे काही जिद्दी खेळाडू मागे पडतात. सागर शेजाळसारख्या मेहनती आणि होतकरू पैलवानाला लोकसहभागातून बळ देण्याची गरज व्यक्त होत आहे.

जिद्द, संघर्ष आणि स्वप्नांची ही कहाणी मंद्रूपच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यासाठी प्रेरणादायी आहे. संकटे कितीही मोठी असली तरी जिद्द असेल तर यशाची शिखरे गाठता येतात, हे सागर शेजाळने सिद्ध केले आहे.

# पंडित दीनदयाल उपाध्याय पुण्यतिथीनिमित्त जनसंपर्क कार्यालयात अभिवादन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१२, चंद्रपूर :** पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त भारतीय जनता पार्टी महानगराच्या वतीने आमदार किशोर जोरगेवार यांच्या जनसंपर्क कार्यालयात आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास आ. किशोर जोरगेवार उपस्थित होते. यावेळी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला भारतीय जनता पार्टीचे माजी महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, मनपा गट नेते चंद्रशेखर शेट्टी, महामंत्री सविता दंढारे, म हिला महामंत्री सायली येरणे, विधानसभा महिला अध्यक्ष वंदना हातगावकर, नगर सेविका ॲड. सारिका संदुरकर, नगर सेवक रॉबिन बिश्वास, प्रविण गिलबिले, मंजुषा कासनगोट्टूवार, प्रलय मशाखेत्री, ताहिर हुसेन, शंकर दंतुलवार यांच्यासह भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. किशोर जोरगेवार म्हणाले की, पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी मांडलेला एकात्म मानववाद हा विचार आजही सम ाजजीवनाला दिशा देणारा आहे.

समाजातील शेवटच्या घटकाचा विचार करून सर्वसमावेशक विकास साधणे, ही त्यांची भूमिका आजच्या



काळात अधिकच महत्त्वाची ठरते. ते पुढे म्हणाले, राष्ट्रनिष्ठा, साधेपणा आणि समर्पित कार्यशैली यांचा आदर्श पंडितजींनी आपल्या आयुष्यातून घालून दिला. त्यांच्या विचारसरणीने भारतीय राजकारणाला नवी दिशा दिली. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण करत, त्यांच्या आदर्शांवर चालण्याचा संकल्प आपण केला पाहिजे, असे ते म्हणाले.

या प्रसंगी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनीही पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या कार्याचा गौरव करत आदरांजली अर्पण केली. कार्यक्रमात भाजपा महानगरातील पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# महानगरपालिकेचे उपमहापौर कृष्णा पाटील यांची मागणी

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.१२, ठाणे :** शहराचा वाढता विस्तार आणि नागरी गरजा लक्षात घेता, मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर ठाण्यातही 'ठाणे शहर विकास समिती' नियुक्त करण्यात यावी, अशी आग्रही मागणी ठाणे म हानगरपालिकेचे उपमहापौर कृष्णा पाटील यांनी राज्य सरकारकडे केली आहे. या संदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांना लेखी निवेदन पाठवले आहे. पारदर्शक विकासासाठी समितीची गरजपत्राद्वारे उपम हापौर कृष्णा पाटील यांनी शासनाचे लक्ष वेधले की, ठाणे शहर सध्या झपाट्याने विस्तारत असून महानगराच्या समस्याही तितक्याच जटील होत आहेत. केवळ सिमेंट-काँक्रीटची जंगले न उभारता शहराचा विकास सर्वसामान्य ठाणेकरांना केंद्रस्थानी ठेवून होणे आवश्यक आहे. मुंबई महानगरपालिकेत शहर विकासासाठी ज्याप्रमाणे विशेष



समिती कार्यरत आहे, त्याच धर्तीवर ठाण्यातही तज्ज्ञांची समिती असणे ही काळाची गरज बनली आहे.

समितीची प्रमुख उद्दिष्टे - उपमहापौरांनी या प्रस्तावित समितीच्या माध्यमातून पाच प्रमुख उद्दिष्टे मांडली आहेतविकास आराखडा (DP) नियंत्रण शहराच्या डेव्हलपमेंट प्लॅनवर बारीक लक्ष ठेवून त्याची पारदर्शक अंमलबजावणी करणे.जनहितकारी धोरणे बिल्डरधार्जिण्या निर्णयांना चाप लावून सर्वसामान्यांच्या हिताची गृहनिर्माण धोरणे राबवणे. भ्रष्टाचार निर्मूलन शहर विकास विभागातील भ्रष्टाचाराला लगाम लावून कामात पारदर्शकता आणणे. ज्वलंत प्रश्नांवर तोडगा - अनधिकृत बांधकामे, फेरीवाल्यांचे अतिक्रमण आणि वाहतूक कोंडी यांसारख्या समस्यांवर कायमस्वरूपी उपाय शोधणे.

हॅपी इंडेक्समध्ये वाढ - नागरी सोयीसुविधांचा दर्जा सुधारून ठाणेकरांचे जीवनमान उंचावण्यावर भर देणे.राज्य सरकारकडे सकारात्मक निर्णयाची अपेक्षाठाणे हे सर्वांच्या जिव्हाळ्याचे शहर असून, शहर विकास विभागाकडून दर्जेदार आणि नियोजनबद्ध काम करून घेण्यासाठी अशा तज्ज्ञ समितीची भूमिका निर्णायक ठरेल, असा विश्वास उपमहापौर कृष्णा पाटील यांनी व्यक्त केला आहे. राज्य सरकारने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने प्रशासनाला निर्देश द्यावेत, अशी विनंतीही त्यांनी केली आहे. या पत्राची प्रत ठाणे मनपा आयुक्तांनाही पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आली आहे.

# थोडक्यात

## अलिबाग येथे जिल्हास्तरीय शेतकऱ्यांची कार्यशाळा संपन्न

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.१२, पेण (रायगड) :** कीटकनाशके फवारणी करताना घ्यावयाची काळजी व उपाययोजना बाबत जिल्हास्तरावर जिल्हा परिषद कृषी विभाग व राज्य शासन कृषी विभाग मार्फत शेतकऱ्यांची



कार्यशाळा गुरुवार, दि.१२ फेब्रुवारी २०२६ रोजी पंचायत समिती अलिबाग सभागृहात घेण्यात आली. यावेळी कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद पवनकुमार नजन, मोहीम अधिकारी महेश नारायणकर, जिल्हा गुण नियंत्रण अधिकारी बुद्धभूषण मुनेश्वर, गट विकास अधिकारी अलिबाग शर्मिला पाटील उपस्थित होते.

यावेळी गोदरेज लाइफ स्टॅक कीटकनाशक उत्पादक कंपनी मार्फत फवारणी सुरक्षा बाबत लाइव्ह प्रात्यक्षिक दाखविले तसेच कीटकनाशक खरेदी, साठवणूक, शिफारशी प्रमाणे द्रावण तयार करणे, फवारणी करताना वापरावयाची सुरक्षा किट तसेच कीटकनाशक फवारणी करताना योग्य काळजी न घेतल्यास त्याचे होणारे दुष्परिणाम उपाययोजना बाबत कृषी विभाग मार्फत प्रशिक्षण देण्यात आले व शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करणेत आली. कार्यक्रमावेळी शेतकऱ्यांना फवारणी सुरक्षा किट चे व माहितीपत्रक चे मान्यवरांच्या वतीने वाटप करणेत आले. शेवटी राजेश घरत विस्तार अधिकारी (कृषी) यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## क्रीडा प्रकारामुळे व्यक्तिमत्व विकास होतो - कुलगुरु डॉ.खर्चे




**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१२, राहुरी (अहिल्यानगर) :** खेळामुळे आपले स्वास्थ्य चांगले राहते, आरोग्य सुदृढ होते, सांघीक भावना वृध्दींगत होऊन आत्म विश्वास वाढतो. यामुळे पुढील आयुष्याची वाटचाल ही प्रगतीची होते. खेळामध्ये विजय पराभव हा होतच असतो. पराभव ही यशाची पहिली पायरी समजावी व पुढील वर्षासाठी जय्यत तयारी करावी. या स्पर्धेच्या युगामध्ये शैक्षणीक योगदान महत्वाचे आहे. यासाठी आरोग्य सुदृढ राहणे गरजेचे असल्याने हे विविध क्रीडा स्पर्धेतून साधता येते. या सर्वाचा परिपाक म्हणुन आपले व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांनी केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे विद्यापीठस्तरीय सन २०२५-२६ च्या कृषि तंत्रज्ञान शिक्षणाच्या क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धांच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरुन कुलगुरु डॉ.विलास खर्चे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, कृषि तंत्रज्ञान शिक्षणाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विजु अमोलिक, काष्टी येथील छत्रपती शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुलाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नांदगुडे, आंतरविद्या शाखा जलसिंचन विभागाचे प्रमुख डॉ. व्ही.एस. पाटील, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विलास आवारी उपस्थित होते.याप्रसंगी डॉ. गोरक्ष ससाणे म्हणाले की क्रीडा स्पर्धेत सहभागी झाल्यामुळे खिलाडूवृत्ती वाढते, शरीर तंदुरुस्त होते आणि आयुष्याला शिस्त लागते. आयुष्यामध्ये एकतरी क्रीडा प्रकारात नैपुण्य असणे गरजेचे आहे. स्पर्धेमध्ये हारजीत महत्वाची नसून सहभाग महत्वाचा आहे. यावेळी डॉ. प्रशांत बोडके यांनी खेळाडूंना खेळतांना संघभावना व मित्रभावना जोपासावी असे आवाहन केले. यावेळी प्रस्ताविक करतांना डॉ.विजु अमोलिक म्हणाले कृषि तंत्रज्ञान शिक्षणाच्या अंतर्गत ८२ कृषि तंत्र विद्यालय असून या विद्यापीठ स्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये १० संघ सहभागी झाले आहे. या स्पर्धेमध्ये ४९७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. या क्रीडा स्पर्धेमध्ये खो-खो, व्हॉलीबॉल, कब्बडी, लांब उडी, उंच उडी इ. मैदानी स्पर्धेचा समावेश आहे. पुणे जिल्ह्यातील खेळाडू यश काळाणे याने सर्व खेळाडूंना शपथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दिलीप गायकवाड यांनी तर आभार डॉ. विलास आवारी यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील विभाग प्रमुख, अधिकारी, घटक विद्यालयांचे प्राचार्य, संघ प्रमुख व विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते. या क्रीडा स्पर्धा आयोजन करण्यामध्ये अशोक हारदे, दत्तात्रय राजे, हेमचंद्र परदेशी, भावसाहेब बेल्हेकर यांनी परिश्रम घेतले.

## विविध विकास कामांचे आमदार राजेंद्र गावित यांच्या हस्ते भूमिपूजन

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१२, डहाणू (पालघर) :** पालघर विधानसभा मतदारसंघातील आदिवासी व ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी आदिवासी विकास विभाग, जिल्हा नियोजन तसेच स्थानिक विकास निधी अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या विविध विकास कामांचे भूमिपूजन आमदार राजेंद्र गावित यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. या अंतर्गत ग्राम पंचायत ओसरविरा (कोरडपाडा), ग्रामपंचायत देहयाळे (पाटीलपाडा), कामडीपाडा, ग्रामपंचायत खानिव, ग्रामपंचायत चरी पावन परिसर तसेच स्मशानभूमी येथे साकव (लहान पूल) उभारणीचे काम, ग्रामपंचायत कासा हद्दीतील खूबरोखपाडा येथे तब्बल ८० लाख रुपयांच्या निधीतून ४०० मीटर लांबीचा सिमेंट काँक्रीट रस्ता, ग्रामपंचायत तवा अंतर्गत रस्ता, तसेच ग्रामपंचायत वेती (सातवी) अंतर्गत रस्ता व समाजमंदिर अशा महत्त्वपूर्ण विकास कामांचा समावेश आहे.

या कामांमुळे आदिवासी पाड्यांतील दळणवळण सुलभ होणार असून ग्रामस्थांना पावसाळ्यातील अडचणी दूर होण्यास मोठी मदत होणार आहे. तसेच समाजमंदिर व रस्ते विकासामुळे सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांना चालना मिळणार असल्याचे मत यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी तालुका प्रमुख संतोष देशमुख, राजकुमार गिरी, रोहित राजेंद्र गावित, सुमित गिरी, आकाश भराडे,आकाश वावरे स्थानिक सरपंच नरेश कोरडा, सुनील भोईर, सुनीता कामडी, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ज्येष्ठ कार्यकर्ते काशिराम रसाळ, भरत डोकफोडे, सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे उपअभियंता पगारे, कासा पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक नितीन डोंगरे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार राजेंद्र गावित यांनी आदिवासी व दुर्गम भागातील पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू असून, भविष्यातही रस्ते, पाणी, वीज, शिक्षण व आरोग्य सुविधांसाठी अधिकाधिक निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे आश्वासन दिले. कार्यक्रमाचा शेवट ग्रामस्थांच्या समाधानकारक प्रतिसादात व उत्साहपूर्ण वातावरणात झाला.